PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Janakee
Year: 1969

Song: Visaru Nako Shrirama Mala 2
Lyricist: Sudhir Moghe

विसरू नको श्रीरामा मला
विसरू नको श्रीरामा मला
मी तुझ्या पाऊली जीव वाहीला
प्रिया...
विसरू नको श्रीरामा मला
विसरू नको

किती जन्म झाली तुझी प्रेमिका मी
कितीदा नव्याने तुला भेटले मी
किती जन्म झाली तुझी प्रेमिका मी
कितीदा नव्याने तुला भेटले मी
तुझी सावली झाले
घेऊनी हिंडले सतीचा वसा
प्रिया...
विसरू नको श्रीरामा मला
विसरू नको

कसे दान आले रिते ओंजळीत
तुझ्याविण झाले अभागी अनाथ
कसे दान आले रिते ओंजळीत
तुझ्याविण झाले अभागी अनाथ
तुझ्या अंकुरासाठी सोसते
झेलते उन्हाच्या झळा
प्रिया...
विसरू नको श्रीरामा मला
विसरू नको श्रीरामा मला
मी तुझ्या पाऊली जीव वाहीला
प्रिया...
विसरू नको श्रीरामा मला
विसरू नको

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*